# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.५८८१ ते ५८८९/२२/अ.क्र.४२३९ ते ४२४७/२५**

**श्री. अरविंद स. चौहान**
४/१४, महावीर अपार्टमेंट,
मंचूभाई रोड, मालाड (पूर्व), मुंबई-४०००४३.

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.-१/२) आर/उत्तर विभाग
बृ.मुं.म.पा. सहाय्यक आयुक्त (दहिसर) आर/उत्तर विभाग कार्यालय,
रुस्तुमजी स्कूलजवळ, रंगनाथ केसकर मार्ग, दहिसर (प.), मुंबई-४०० ०६८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, आर/उत्तर विभाग
बृ.मुं.म.पा. सहाय्यक आयुक्त (दहिसर) आर/उत्तर विभाग कार्यालय,
रुस्तुमजी स्कूलजवळ, रंगनाथ केसकर मार्ग, दहिसर (प.), मुंबई-४०० ०६८.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०७.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) आर/उत्तर विभाग, श्री.अनिल डिघोळे, श्री.डेन्झील फर्नांडीस उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी दि.०२.०६.२०२२ रोजी "जोडपत्र-अ" मध्ये खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे:

Information regarding action taken on the information letter dispatched in your office dated 02/03/2022 of "SATYAM PAN BHANDAAR NEXT TO CHICKEN SHOP, S. V. ROAD, WESTERN EXPRESS HIGHWAY SERVICE ROAD, GHARTANPADA NO. 2, DAHISAR (EAST), MUMBAI 400 068.

Information regarding action taken on the information letter dispatched in your office dated 02/03/2022 of "Near Shingte Khadaan, S.N.Dubey Road, Kokanipada, DAHISAR (EAST), MUMBAI 400 068.

Information regarding action taken on the information letter dispatched in your office dated 02/03/2022 of "KANKUBEN BHARWAAD CHAWL, OPP. SUYOG NAGAR SARWAJANIK SAUCHALAYA, BEHIND KARAN VILLA CHSL., SANT MEERABAI ROAD, GHARTANPADA NO. 2, DAHISAR (EAST), MUMBAI 400 068.

Information regarding action taken on the information letter dispatched in your office dated 02/03/2022 of "KESHAV NAGAR REHWASI SEWA SANGH, SANT NAAMDEO MAHARAJ MARG, DAHISAR (EAST), MUMBAI 400 068.

Information regarding action taken on the information letter dispatched in your office dated 02/03/2022 of "CHINTAMANI NAGAR SOCIETY, NEXT TO ACCU HOLISTIC HEALTH INDIA, NEAR B.M.C MARATHI SCHOOL, SHIV VALABH ROAD, ASHOKWAN, DAHISAR (EAST), MUMBAI 400 068".

Information regarding action taken on the information letter dispatched in your office dated 02/03/2022 of "CINTAMANI NAGAR SOCIETY, NEXT TO ANNAPURNA PADATTICHE JEWAN, NEAR B.M.C MARATHI SCHOOL & UNIVERSAL SCHOOL, SHIV VALLABH ROAD, ASHOKWAN, DAHISAR (EAST), MUMBAI 68".

Information regarding action taken on the information letter dispatched in your office dated 02/03/2022 of "SHOP NO. 3, VIJAY MEDICO, GURKHA CHAWL, OPP. HOTEL BAJRANG, SANT KABIR MARG, KOKANIPADA, DAHISAR (EAST), MUMBAI 400 068".

Information regarding action taken on the information letter dispatched in your office dated 02/03/2022 of "JAI BHAWANI CHAWL, OPP. SIDDHIVINAYAK CHAWL, SUYOG NAGAR, GHARTANPADA NO. 2, SANT MEERABAI ROAD, DAHISAR (E), MUMBAI 400 068".

Information regarding action taken on the information letter 499 dispatched in your office dated 02/03/2022 of "MULCHAND YADAV CHAWL, OPP. HOTEL DURGA – CHAUDHARI COMPOUND & BHAGYASHREE APT., NEXT TO SHOP NO.5-SADGURU STORES, SANT MEERABAI ROAD, GHARTANPADA NO. 2, DAHISAR (EAST), MUMBAI 400 068".

याबाबत विविध तक्रार अर्जावर कथित अनधिकृत बांधकामावर केलेल्या कार्यवाही बाबत व अनधिकृत बांधकामांना देण्यात आलेल्या परवानगी विषयी माहितीची मागणी केली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इवका) आर/उत्तर विभाग यांचे कार्यालयात अपीलार्थी यांनी एकूण ०९ माहिती अर्ज करून अर्जामध्ये मागीतलेली माहिती ही ३ वर्षांपूर्वीच्या कालावधीमधील असून आपण वेगवेगळ्या मुद्दयाच्या अत्यंत विस्तृत व व्यापक व तसेच संकलित कराव्या लागणाऱ्या महितीची मागणी केली आहे. याबाबत एका प्रकरणात पुढीलप्रमाणे उत्तर देण्यात आले आहे :- "केंद्रीय माहिती आयुक्त यांचेकडील Shri. Ramesh Chand Jain VS Delhi Transport Corporation GNCTD, Delhi Case No. CIC/AD/A/2013/001326-SA मध्ये खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"The Commission noticed that several applicants seek some information from one wing of the public authority, and based on the responses file a bunch of RTI questions from the same or other wing of same public authority, or from other authority. This will have a continuous harassing effect on the public authority. As the PIOs go on answering, more and more questions are generated out of the same proportion the number of repeated first appeals will be growing."

1. Even a single repletion of RTI applications would demand the valuable time of the public authority first appellate authority and if it also reaches second appeals that of the commission which time could have been spent to hear other appeals or answer another application or perform other public duty.
2. Even repetition of RTI application which was earlier responded will be an obstruction to flow of information and defeats the purpose of RTI Act. The Central Information Commission, vide its decision CIC/AD/A/2013/001326-SA dated 25.06.2014 has thus decided that:-
    I. No Scope of repeating under RTI Act.
    II. Citizen has no Right to Repeat.
    III. Repetition shall be ground of refusal.
    IV. Appeals can be rejected."

केंद्रिय माहिती आयोगाने एस. के. लाल विरुद्ध रेल्वे मंत्रालय (अपील क्रं. सीआयसी / ओके / ए/2006 /00268272/ दि. 29.12.2006) या प्रकरणात अपिलार्थीने रेल्वे प्राधिकरणकडे दाखल केलेल्या पाच अर्जान्वये रेल्वे विभागाच्या विविध सेवा व कर्मचारी यांची "संपूर्ण / सर्व अभिलेख" याबाबत माहिती मागितल्याप्रकरणी निकाला पारित करताना खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.

"केंद्रीय माहिती आयोगास प्रस्तुत प्रकरणी असे निदर्शनास आले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ हा जरी नागरिकांना कलम ८ अन्वये वगळण्यात आलेल्या १० बाबींशिवाय इतर, अशी कोणतीही माहिती प्राप्त करून घेण्याचा अधिकार प्रदान करीत असला तरी, याचा अर्थ असा नव्हे की, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी अशा प्रकारच्या शुल्लक व अर्थहीन माहिती अर्जाची दखल घ्यावी". तसेच रेल्वे विभागाच्या विविध सेवा व कर्मचारी वर्गाशी संबंधित "संपूर्ण / सर्व अभिलेख' यांच्या माहितीच्या मागणी करणे हे "केवळ माहिती अधिनियमांशी थट्टा उडविणे" आहे. तसेच याबाबत मा. उच्च न्यायालय आंध्रप्रदेश हैद्राबाद Writ Petition No. 20182 दि. 27.01.2009 मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

The Act is an effective device which, if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relives an applicant from obligation to disclosed the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be at the cost of ordinary functioning beyond a point to may even become harassment for the concerned agencies. Much need to be done in this direction impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic"

आता आपले लक्ष मा.राज्य माहिती आयुक्त नाशिक खंडपीठ यांचेकडे झालेल्या द्वितीय अपील क्र.1637/2015/ अहमदनगर वेधण्यात येत असून या अपिलामध्ये अपिलकर्त्याने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने अशी माहिती पुरविण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री वळवावी लागेल असे स्पष्टपणे दिसते. तसेच सार्वजनिक प्राधिकरण हे आपले काम सांभाळून माहिती अधिकाराचे काम करत असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ पोटकलम (९) च्या अनुषंगाने अशी माहिती पुरविण्याचे नाकारता येते असे स्पष्टपणे नमूद करून निर्णय पारित केलेला आहे.

वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करता, आपण ५९ अर्जान्वये मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत व व्यापक तसेच संकलित करावी लागणारी माहिती असून या महितीतून कुठल्याही प्रकारे व्यापक जनहित साध्य होणार नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ चा गैरवापर करून या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचा बहुमूल्य शासकीय वेळ व शासकीय साधनसंपत्तीचा अपव्यय करण्याच्या हेतूने माहितीची मागणी केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. अशाच एका प्रकरणासंबंधात मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील नं. 6454/2011 दि. 09.08.2011 रोजी या प्रकरणी Applicant central board of education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizen. Not should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the to do their duty the nation does not want a scenario where 75% of the staff of public authorities spend 75% their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI

Act and pressure of the authorities under the RTI Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing at the cost of their normal and regular duties.

Mr. Nitish Kumar Tripathi Vs CPIO Of Ministry Health and Family दि. 04.07.2014 मध्ये दिलेल्या निर्णयानुसार माहिती अधिकार हा वारंवार वापरण्याचा अधिकार नाही असे स्पष्ट केले आहे व तसेच CIC/SA/A/2014/000543 & CIC/SA/A/2014/000652 नुसार वारंवार व त्रास देण्याच्या उद्देशाने माहिती मागत असल्यास त्यास अपात्र करणे आणि त्यानंतरही तशीच कृती चालू ठेवल्यास त्याविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याबाबत सूचित केले आहे. सर्वोच्च न्यायालयातील खटला ICAI VS Shaunak H. Satya (2011) 8 SCC 781 मध्ये कोणीही व्यक्ति कायद्याचा दुरुपयोग करीत असेल तर त्यांचे असे वर्तन कायद्यानुसार नियंत्रणात आणावे असे स्पष्ट केले आहे. तसेच मा.शैलेश गांधी यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उपयोग कायदेशिर हत्यार म्हणून करीत आहेत. जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information **Shri Shailesh Gandhi** in case numbers No.CIC/SG/C/2011/000760, CIC/SW2011/000926/SG, CIC/SM/A/2011/001111/SG, CIC/SM/A/2011/002909, Dated 17th Januar, 2012) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information.... At this juncture the Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual. In the present matter, it must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him.... The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application end appeals with the respondent public authority and the commission, is wasting public resources."

तसेच असेही नमूद केले आहे की, वारंबार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांच्या अंतस्थ व्यक्तीगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तीगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही. यावरुन माहिती अधिकार कायद्यांतर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय द्वितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमावारीनुसार प्राप्त झालेल्या द्वितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

आपण वरीलप्रमाणे केलेले एकूण ०९ माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपण मागितलेली माहिती ही अत्यंत विस्तृत व व्यापक असून सदरच्या माहितीतून कुठल्याही प्रकारचे व्यापक जनहित साध्य होणार नसल्यामुळे तसेच वरील सर्व अनुषंगिक निर्णय लक्षात घेता आपण मागणी केलेली माहिती सद्यस्थितीत उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही. आपणास विनंती करण्यात येते की, आपण माहितीचे

निरीक्षण करून केवळ एका विषयाच्या माहितीची मागणी करावी अन्यथा वर उल्लेख केलेले सर्व अर्ज दफ्तरी दाखल करण्यात येतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच यापुढे आपण वरील सर्व बाबींची दक्षता घेऊन मोजक्या स्वरुपाच्या व केवळ एका विषयाच्या महितीची मागणी करावी ही विनंती", असा प्रतीसाद दिला आहे.

यासंदर्भात देण्यात आलेला प्रतीसाद हा असमाधानकारक आहे असा दावा करत अपीलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी आर/उत्तर विभाग यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही किंवा आदेश प्राप्त झाले नाही असे अपीलार्थी यांनी नमूद केले आहे. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) आर/उत्तर विभाग व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी आर/उत्तर विभाग यांनी जाणुनभुजून माहिती दडवित आहे असे नमूद करीत अपीलार्थी यांनी दि. ०१.११.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणी अपील अर्जाचे अवलोकन केले असता "जोडपत्र-अ" व "जोडपत्र-ब" मध्ये जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक उत्तर दिले आहे. ही बाब लक्षात घेता सदर माहिती देण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागेल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत **कलम ७ (९)** व महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम (सुधारणा) नियम २०१२ मधील **३ (क)** नुसार ही माहिती देय नाही. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) आर/उत्तर विभाग यांनी अपिलार्थीस माहिती मिळवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्याने त्यांची भुमिका माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार सुसंगत दिसून येते.

आज झालेल्या सुनावणीत अपीलार्थी यांच्या म्हणण्यानुसार मागणी केलेल्या अनधिकृत बांधकाम संबंधित देण्यात आलेल्या परवानगीबाबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या **कलम २(च)** नुसार माहिती दिली असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील **कलम २(च)** नुसार माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील दस्ताऐवज अभिलेख, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, अहवाल नमुने, कागदपत्रे, कोणतीही ईलेक्ट्रॉनीक स्वरुपातील आधार सामग्री इत्यादीचा समावेश होतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार एखादया विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखादया कार्यवाही मागील खुलाशा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादया कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही. अपीलार्थी यांना प्रस्तुत प्रकरणी माहिती अपेक्षित नसून अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणातील उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याची आवश्कता सर्व नागरीकांना असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या **कलम २ (त्र)** नुसार कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याऱ्याचा अधिकार असा आहे आणि त्यामध्ये एखादे काम, दस्ताऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे, दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे, सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे, डिस्केट, फलॉपी,टेप, व्हिडिओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्या बाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्ट आऊट) मार्फत माहिती मिळविणे, याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या **कलम ३** नुसार अधिन राहून सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल. अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर प्राधिकरणांने केलेल्या कार्यवाहीशी संबंधित आहे. प्रस्तुत प्रकरणी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) आर/उत्तर विभाग यांनी अपीलार्थी

यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध असल्यास अपीलार्थीस पुरविण्यात यावी. जर अपीलार्थी यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध नसल्यास तर सदर माहिती निरंक आहे असे सुस्पष्ट लेखी उत्तर कळविण्यात यावे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २८.०७.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra